**सामान्य प्रशासन विभाग, जि.प.सोलापूर**

जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-१२/अकंपा/११२/२०२२
सोलापूर दिनांक - ०३/०८/२०२२

**प्रति,**

-------------------------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------

**विषय:-** अनुकंपा भरती प्रक्रियेकरीता कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दि. २९/७/२०२२ रोजी आयोजीत केलेल्या कॅम्पला अनुपस्थित असलेस दिनांक ८/८/२०२२ रोजी उपस्थित राहणेबाबत

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, अनुकंपा उमेदवरांच्या भरती प्रक्रियेकरीता कागदपत्रांच्या पडताळणीसाठी काही कारणास्तव दिनांक २९/७/२०२२ रोजी आयोजीत केलेल्या कॅम्पला अनुउपस्थित असलेस जे उमेदवार अनुपस्थित होते अश्या उमेदवाराकरीता **दिनांक ८/८/२०२२ (सोमवार) सकाळी ११-०० वा. रोजी वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद सोलापूर येथे** कॅम्प आयोजित करणेत आलेला आहे.

सदर कॅम्पमध्ये १) कर्मचाऱ्याच्या मृत्युनंतर एका वर्षाचे आत अनुकंपा नोकरीसाठी केलेले अर्ज,२) सज्ञान झालेनंतर एका वर्षाचे आत अनुकंपा नोकरीसाठी केलेले प्रथम अर्ज, ३) विहित नमुना अर्ज,४) कुटूंबातील वारसांचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञालेख), ५) अनुकंपा नोकरी देणेसाठी कुटूंबातील अन्य वारसांचे संमतीपत्र (प्रतिज्ञालेख),६)कुटूंबातील कोणतेही सदस्य शासकीय / निमशासकीय सेवेत नसल्याचे प्रतिज्ञालेख, ७) कर्मचाऱ्याच्या पत्नीचा अनुकंपासाठी अर्ज असल्यास पुर्नविवाह न केलेचा प्रतिज्ञालेख, ८) शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्रे, गुणपत्रक, ९) जन्म तारखेसंबंधीत कागदपत्र, १०) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र, ११) कर्मचाऱ्याच्या मृत्युपश्चात कुटुंब निवृत्ती वेतन व मिळालेल्या इतर लाभांचे आदेश,१२) कर्मचाऱ्याचा मृत्यु दाखला इ.मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे.

तेंव्हा आपण उपरोक्त मूळ कागदपत्रांसह दिनांक ८/८/२०२२ रोजी खालील नमुद केलेल्या अनुक्रमांकानुसार देणेत आलेल्या वेळेत **यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद सोलापूर** येथे न चुकता उपस्थित रहावे. सदर दिवशी वेळेवर उपस्थित राहणे ही आपली जबाबदारी आहे. उपस्थित न राहिल्यास आपल्या अनुकंपा नियुक्तीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

टिप - **प्रतिक्षायादीमधील ज्या उमेदवारांची दिनांक २९/७/२०२२ रोजी कागदपत्रांची पडताळणी झाली आहे अश्या उमेदवारांनी येऊ नये.**

मा.मु.का.अ. यांचे मान्यतेने

(चंचल पाटील)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.)
जिल्हा परिषद, सोलापूर